प्रकरण ३

# इतिहासलेखन प्रक्रिया

## (Process of History Writing)

मानवाला आपल्या भूतकाळाबद्दल नेहमीच जिज्ञासा असते. भूतकाळात घडून गेलेल्या घटनांपासून मानवाला प्रेरणा व स्फूर्ती मिळते. तसेच भूतकाळातील घटनांचा अभ्यास केल्यानंतर मानवाकडून झालेल्या चुकाही लक्षात येतात. या सर्व एकत्रित अभ्यासाने वर्तमानकाळातील वस्तुस्थितीचे ज्ञान प्राप्त होते. या ऐतिहासिक घटनांच्या अन्वयार्थातून भविष्यकाळात जास्तीतजास्त अचूक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते. म्हणून इतिहास संशोधन, इतिहासलेखन व त्यांची प्रक्रिया समजावून घेणे आवश्यक ठरते. पूर्वी इतिहास म्हणजे केवळ राजे-रजवाडे, त्यांनी केलेल्या लढाया, तह व जिंकलेले प्रदेश या घटनांचा अभ्यास म्हणजे इतिहास असे मानले जात होते. पण काळाच्या ओघात इतिहासाच्या या संकल्पनेत खूप बदल झालेला आहे. पुढेही बदल होत राहील. कारण भूतकाळात घडून गेलेली एखादी घटना दिसते तेवढी साधी, सोपी व सरळ नसते. कारण त्या घटनेवर अनेक गोष्टींचा प्रभाव पडलेला असतो. त्या गोष्टी म्हणजे त्या काळातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय या व अशा अनेक घटनांचा परिणाम झालेला असतो. परिणामी, इतिहासाचे स्वरूप बदलत गेले. इतिहासाची व्याप्ती वाढत गेली. इतिहासाचा संकुचित दृष्टीकोन दूर होऊन व्यापक दृष्टीकोन येऊ लागला. "प्रत्येक घटनेची चिकित्सक मीमांसा हा आधुनिक इतिहासाचा आत्मा आहे." इतिहासाच्या स्वरूप, व्याप्ती यात होत असलेल्या बदलांमुळे व नव्या दृष्टीकोनामुळे इतिहास संशोधन व लेखन जास्त काळजीपूर्वक व शास्त्रीय पद्धतीने करणे आवश्यक ठरते.

मानवाच्या भूतकाळाचा अभ्यास हा ऐतिहासिक संदर्भ साधनांवर अवलंबून असतो. या संदर्भ साधनांच्या ऐतिहासिक कागदपत्रांना महत्त्वाचे स्थान आहे. म्हणजेच इतिहासलेखन प्रक्रियेत कागदपत्रांना सर्वांत महत्त्वाचे स्थान आहे. ऐतिहासिक कागदपत्रांचे व संदर्भ साधनांचे संकलन झाल्यानंतर त्यांचे वर्गीकरण करून कागदपत्रांची सुसंगती लावणे, कालानुक्रमे मांडणी करणे व त्यांचे मूल्यमापन करून त्यांची सत्यता तपासून घ्यावी लागते. त्या नंतर इतिहासकारास त्या संदर्भ साधनांचे अन्वयार्थ लावून इतिहासलेखनाचे सादरीकरण करावे लागते. अशा प्रकारे इतिहासलेखन प्रक्रियेस महत्त्वाच्या चार टप्प्यांमधून जावे लागते. ते चार टप्पे म्हणजे,

Scanned by TapScanner

(अ) विषयाची निवड (Selection of Topic)

(ब) कागदपत्रांची / प्रकरणांची मांडणी (Chapter Scheme)

(क) संदर्भ साधनांचे मूल्यमापन (Evaluation of Sources)

(ड) सादरीकरण (Presentation)

इतिहासलेखन प्रक्रियेला या चार टप्प्यांतून जात असताना जो इतिहासाचे लेखन करणार आहे, इतिहास संशोधक आहे त्याच्या अंगी काही गुण असणे आवश्यक आहे. इतिहासकाराकडे आवश्यक असणाऱ्या गुणांचा समुच्चय असेल तर इतिहासाचे लिखाण हे वस्तुनिष्ठ व ऐतिहासिक सत्याच्या जवळ जाणारे होते.

## इतिहास संशोधकाचे गुण

इतिहास संशोधन व इतिहासलेखन करणे ही एक अत्यंत कष्टाची, चिकाटीची व जिद्दीची गोष्ट आहे. आपण अंगीकृत केलेला, स्वीकारलेला जो विषय आहे, त्याची स्वच्छ व स्पष्ट संकल्पना इतिहासकारास असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याच्या अंगी पुढील गुणांचा समुच्चय असावा. ते गुण थोडक्यात पुढीलप्रमाणे -

१. संशोधनासाठी निवडलेला विषय हा त्याचा आवडीचा विषय असावा.

२. संदर्भ साधने जमवत असताना खूप संयम व चिकाटी असावी. संदर्भ साधने सहजासहजी उपलब्ध होत नसतील तर निराश न होता आपल्या कामात सातत्य ठेवून चिकाटी धरावी, संयम बाळगावा.

३. त्याच्या अंगी नीतिमत्ता व प्रामाणिकपणा असावा.

४. त्याच्या अंगी नम्रता, शांतता व गंभीरता असावी.

५. त्याच्या ठायी संयम, सदसद्विवेकबुद्धी, चौकसपणा व व्यवहारज्ञान असावे.

६. त्याने कोणत्याही घटनेकडे भावनिक व आपुलकीच्या दृष्टीने पाहू नये. त्याच्याकडे न्यायबुद्धी असावी.

७. लिखाणामध्ये वस्तुनिष्ठता हवी. त्याने वस्तुस्थितीचे भान ठेवून लिखाण करावे.

८. सामान्यीकरणात तर्कनिष्ठता असावी.

९. त्याने कोणताही समाज, धर्म, संस्कृती व व्यक्तीवर कठोर टीका करू नये.

### (अ) विषयाची निवड (Selection of Topic)

इतिहास संशोधन करण्याचा संशोधकाचा निर्णय झाला की त्याला प्रथम ठरवावे लागते की कोणता विषय निवडावा? कोणताही संशोधक संपूर्ण जगाचा इतिहास लिहिण्याचे

ठरवत नाही. कारण हे जग, या जगातील वेगवेगळी राष्ट्रे, विविध भू-प्रदेश, त्यांची संस्कृती, समाज, अर्थकारण, धर्मकारण व राजकारण यांच्यात प्रचंड विविधता आहे. त्या-त्या देशाचा प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहास या सर्वांचा समग्र अभ्यास करणे, आढावा घेणे, त्यांचे संशोधन करणे, त्यांचे विश्लेषण करणे कोणत्याही तज्ज्ञ इतिहास संशोधकास अशक्य आहे. म्हणून संशोधकाने एखाद्या राष्ट्राच्या विशिष्ट प्रदेशातील, विशिष्ट काळाचा मर्यादित अभ्यास करणे व संशोधन करणे योग्य ठरते. त्यामुळे त्याला त्या-त्या ठरावीक प्रदेशांचा मर्यादित पण विशिष्ट काळाचा बारकाईने आणि सर्वांगीण अभ्यास करणे शक्य होते.

अशा प्रकारे त्या प्रदेशाच्या उपलब्ध इतिहासाचे समग्र व बारकाईने वाचन करणे आवश्यक असते. म्हणूनच संशोधकाने आपली आवड कशात आहे, कोणत्या घटनेत आपणास विशेष रस आहे, याचा प्रथम विचार करावा लागतो व त्यातून आपल्या विषयाची निवड करावी लागते. आपण निवडलेला विषय हा सामान्य माणसाची आवड, जिज्ञासा व गरज पूर्ण करणारा आहे का हेसुद्धा पाहावे. संशोधन विषयाची एकदा निवड झाली की, आपण निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने काही संशोधन झाले आहे का? हे पाहावे लागते. आपणास झालेल्या संशोधनाची समग्र सूची व काळाच्या ओघात प्रकाशित होणाऱ्या सूचींचे अवलोकन करावे लागते. त्यातून संशोधनाचे स्वरूप व व्याप्ती आपल्या लक्षात येते. हे सर्व पाहिल्यानंतर आपण निवडलेल्या विषयाच्या संदर्भात जी-जी उपलब्ध संदर्भ साधने आहेत ती कोठे उपलब्ध होऊ शकतील? ती साधने कोणकोणत्या भाषेत असतील? व ती सर्व कशी उपलब्ध होऊ शकतील? आपण निवडलेल्या विषयाच्या संदर्भात पुरेशी व आवश्यक साधने उपलब्ध आहेत का हे काळजीपूर्वक पाहावे लागते. त्याशिवाय आपले संशोधन हे पूर्णत्वास जाऊ शकणार नाही. या सर्वांची खात्री झाल्यानंतर निवडलेल्या विषयाच्या संदर्भात संदर्भ साधनांचे संकलन करणे आवश्यक ठरते.

**२) संदर्भ साधनांचे संकलन :** एकदा आपल्या संशोधन विषयाची निवड झाल्यानंतर आपल्या विषयाच्या संदर्भात संदर्भ ग्रंथाची यादी तयार करावी लागते. या संदर्भ साधनांमध्ये प्राथमिक संदर्भ साधने व दुय्यम संदर्भ साधने अशी विभागणी करणे गरजेचे असते. इतिहासातील संशोधन हे भूतकाळातील कागदपत्रांवरून केले जाते म्हणून इतिहासलेखन प्रक्रियेत कागदपत्रांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या संदर्भात **प्रा. लँजिलॉस** व **सिनबॉस** म्हणतात, "कागदपत्रे हीच गतकालाचा मुख्य आधार आहेत." पुढे जाऊन ते म्हणतात, "कागदपत्रे नाहीत, इतिहास नाही." (No Document, No History) असे असले तरी भूतकाळातील सर्वच घटनांची कागदपत्रे मिळतील याची खात्री नसते. अशा

Scanned by TapScanner

वेळी नाणी, शिलालेख, आलेख, शस्त्रे, अवजारे मुद्रा, वस्त्रे व अलंकार इत्यादी पुरातत्वीय साधनांचा वापर करावा लागतो. या संदर्भ साधनांत प्रत्यक्ष ऐतिहासिक घटना पाहिलेल्या व्यक्तींनी दिलेली किंवा लिहून ठेवलेली माहिती अधिक महत्त्वाची असते. परंतु अशा प्रत्यक्ष निरीक्षणांची माहिती मिळविणे गतकालाच्या दृष्टीने कठीण असते. त्यामुळे प्रत्यक्ष घटना घडून गेल्यानंतर जे पुरावे शिल्लक राहिलेले असतात त्यांच्या साह्याने इतिहासलेखन करावे लागते. कागदपत्रे गोळा करत असताना कालानुक्रम व घटनांच्या, प्रसंगांच्या अनुक्रमाने त्यांचे वेगवेगळे विभाग पाडणे, त्यांची मांडणी करणे आवश्यक असते. कोणत्याही देश, प्रदेश अथवा राजघराण्यांच्या इतिहासाचे लेखन करत असताना विशेषत: कालमानानुसार इतिहासलेखन करण्याची पद्धती स्वीकारली जाते. अशा वेळी संबंधित कालखंडातील कागदपत्रे एकत्रित केली जातात. अशा प्रकारे सर्व संदर्भ साधनांचे संकलन झाले तरी हे ऐतिहासिक पुरावे स्वत: बोलत नाहीत. त्या पुराव्यांना म्हणजेच ऐतिहासिक घटनेला बोलते करण्याचे महत्त्वाचे काम हे इतिहासकाराला करावे लागते. या संदर्भात प्रो. इ. एच. कार आपल्या 'What is History ?' या ग्रंथात म्हणतात. "ऐतिहासिक घटना बोलत नाहीत तर इतिहासकारच घटनांद्वारे बोलत असतो." अशा प्रकारे इतिहासकाराने आपल्या विषयाची निवड केल्यानंतर त्या सर्वांचा समन्वय साधून घडून गेलेल्या ऐतिहासिक घटनेचे सलग व सुसंगत असे चित्र उभे करावे लागते. विषयाची निवड करत असताना संशोधकाने पुढील गोष्टींचा विचार करणे आवश्यक ठरते. त्या गोष्टी पुढीलप्रमाणे –

१. देश, भू-प्रदेश, तेथे घडलेल्या घटना याप्रमाणे विभाग करावेत.

२. त्या–त्या देशांत होऊन गेलेल्या राजसत्तांचा, राजघराण्यांचा कालानुक्रमे अनुक्रम लावून घ्यावा.

३. राजघराणी, राजे यांच्या कारकिर्दीनुसार लेखनाची मांडणी करावी.

४. एखादी घटना, प्रसंग किंवा व्यक्तिमत्त्वाचा इतिहास लिहिताना कालानुक्रम व प्रसंगक्रम यांचा सुसंगतवार व अर्थपूर्ण मेळ घालावा.

५. धार्मिक इतिहास लिहिताना व्यक्तिमत्त्व, त्याचे चरित्र, कालक्रम व प्रसंगक्रम यांचा समन्वय साधावा.

अशा प्रकारे आपल्या आवडीच्या व विपुल संदर्भ साधने उपलब्ध असणाऱ्या विषयाची निवड संशोधनासाठी करावी.

Scanned by TapScanner

## ३) (ब) कागदपत्रांची / प्रकरणांची मांडणी (Chapter Scheme)

एकदा विषयाची निवड होऊन त्या संदर्भातील सर्व ऐतिहासिक संदर्भ साधने व कागदपत्रांचे संकलन झाल्यानंतर किंवा आपल्या विषयाच्या संदर्भात सर्व प्रकारची साधने एकत्रित गोळा केल्यानंतर इतिहासलेखक किंवा संशोधक यांच्यापुढे एक प्रश्न उभा राहतो व तो म्हणजे कागदपत्रांची मांडणी करणे, कागदपत्रांची सुसंगती लावणे किंवा कागदपत्रांचे संघटन करणे. अर्थात, आपण निवडलेल्या विषयाच्या संशोधनाचा आराखडा तयार करणे, आपल्या विषयाच्या प्रकरणांची योजना आखणे (Chapter Scheme), प्रकरणांची मांडणी करणे होय. अशा प्रकारे कागदपत्रांची मांडणी झाल्यानंतर आपल्या विषयाचे संशोधन कोणत्या दिशेने जाणार आहे, कशा प्रकारे वाटचाल करणार आहे हे स्पष्ट होते. संशोधनाची एक साचेबद्ध आकृती आपल्यासमोर उभी राहते आणि म्हणूनच संशोधकास आपल्या विषयाला धरून प्रकरणे पाडावी लागतात, प्रकरणांची योजना करावी लागते. ही प्रकरणांची केलेली योजना म्हणजेच आपल्या संशोधनकार्याचा कच्चा आराखडाच असतो. या आराखड्यात संशोधन जसजसे पुढे जाईल तसतसा आपल्या गरजेनुसार प्रकरणात बदलसुद्धा होऊ शकतो. अशा प्रकारे कागदपत्रांची मांडणी झाल्यानंतर संशोधकास त्या कागदपत्रांना बोलते करावे लागते. कागदपत्रांची जुळणी, मांडणी करत असताना इतिहासकारास ऐतिहासिक वस्तुनिष्ठता (Historical Objectivity) चे भान सतत ठेवावे लागते. कागदपत्रांच्या मांडणीत, सुसंगती लावण्यात जर ऐतिहासिक वस्तुनिष्ठता नसेल तर योग्य निष्कर्ष निघणार नाहीत. एकदा कागदपत्रांची सुसंगतवार मांडणी झाली की संशोधकाने आपल्या संदर्भ साधनांना, काय घडले? कोठे घडले? कधी घडले? कसे घडले? व कोणी घडवले? अशा स्वरूपाचे प्रश्न विचारावेत. अशा प्रश्नांमुळे घटनांतील कार्यकारणभाव (Causation) स्पष्ट होतो. स्पष्ट झालेला कार्यकारणभाव प्रस्थापित करता येतो. त्यामुळे घटनांचे स्पष्टीकरण करणे सोईचे होते. कागदपत्रांचे हे स्पष्टीकरण करत असताना साधनांची व त्यातील मजकुराची सत्यता पडताळून पाहणे आवश्यक ठरते. कागदपत्रांतील घटना या कालानुसार सुसंगतपणे मांडल्या पाहिजेत. तसेच तर्कसंगत असा अर्थ लावला पाहिजे. त्यासाठी अभ्यासू, जिज्ञासू व समर्थ इतिहासकार असणे आवश्यक ठरते. या संदर्भात प्रा. लुईस गॉसचॉक म्हणतात, "मानवाच्या सर्व भूतकाळाची पुनर्रचना करणे हे जरी इतिहासकाराचे मुख्य ध्येय असले तरी ते संपूर्णपणे गाठणे अशक्य आहे." असे असले तरी इतिहासकाराने वस्तुनिष्ठ दृष्टीकोन ठेवूनच इतिहासाची मांडणी करणे आवश्यक आहे व असे केले तरच वस्तुनिष्ठ व विश्वासार्ह इतिहासाचे लेखन होणे शक्य असते.

Scanned by TapScanner

कालानुक्रमानुसार निवडलेल्या विषयांचे कालखंड पाडणे लेखनासाठी सोईचे ठरते; कालखंड कोठून पाडावयाचे, कोणत्या घटनेच्या आधारे पाडावयाचे इत्यादी प्रश्न राहतात. पण इतिहासाला वेगळी कलाटणी देणारी (Turning Point) जी घटना सते, इतिहासाचा प्रवाह बदलण्याची शक्ती ज्या घटनेत असते त्यानुसार कालखंड ावेत. तसेच व्यक्तिमत्त्वविषयक व भौगोलिक स्थानानुसारसुद्धा इतिहासाची मांडणी णे सोईचे ठरू शकेल. उदा. एखाद्या व्यक्तीचे चरित्र लिहिताना त्या व्यक्तीच्या ाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक वर्तनाचा व कार्याचा वस्तुनिष्ठ आढावा घेणे प्राप्त ठरते.

तर्कसंगती : इतिहास संशोधकाने जी साधने जमवलेली असतात त्यामध्ये बऱ्याच व फटी असतात. इतिहासकाराला इतिहासलेखन करताना या त्रुटी व फटी भरून ण्याचे काम करावे लागते. त्यासाठी त्याला कागदपत्रांच्या आधारेच तर्कसंगत असा ार माडावा लागतो. संदर्भ साधनांतील उणिवा या तर्कशुद्ध पद्धतीने मांडणी करून दूर व्या लागतात. जी त्रुटी किंवा उणीव असते तिचा संदर्भ इतर साधनांमध्ये शोधावा तो किंवा त्या साधनांतून अप्रत्यक्षपणे त्या घटनेविषयी सूचक बोध मिळतो. त्याचा र करून तार्किक सुसंगती लावूनच दोन घटनांचा सांधा जुळविणारे अनुमान अथवा र्ष काढावा लागतो. पण हे अनुमानाधारित केलेले सामान्यीकरण हे अत्यंत सावधगिरीने वे लागते. एखादी घटना घडल्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पुरावा अगर संदर्भ कोठेच त नाही. त्या वेळी इतिहासकाराने अनुमान काढण्याचा आग्रह धरू नये. पण एखाद्या साधनातून पुरावा नसलेल्या घटनेचा उल्लेख जर अप्रत्यक्षरित्या ध्वनित होत असेल मात्र अनेक बाबींचे साह्य घेऊन इतिहासकारास काढलेल्या अनुमानाचे तर्कसंगत न्यीकरण करावे लागते.

इतिहासकाराने आपल्या लेखनात व्यक्तिनिष्ठता, धर्मनिष्ठता, प्रादेशिकता, ष्ठत्व, पक्षपातीपणा आणि मत्सर यांचे प्रदर्शन करता कामा नये. त्याने भूतकाळातील ला जास्तीतजास्त न्याय देण्यासाठी वस्तुनिष्ठ लिखाण करावे. त्याने आपली भाषा ाधी, सोपी व सरळ वापरावी. कागदपत्रांची व विषयाची मांडणी पुढीलप्रमाणे वी.

१. इतिहासलेखनाची कारणे व उद्देश

२. निवडलेल्या विषयाचे स्वरूप व व्याप्ती

३. विषयाचा कालखंड

४. संबंधित व्यक्तीचे कार्य

५. समारोप व परिणाम.

अशा प्रकारे विषयाची मांडणी करावी, प्रकरणांची योजना करावी व इतिहासलेखन हे जास्तीतजास्त वस्तुनिष्ठ व सत्याच्या जवळ जाईल, असे लिहावे.

## ३) (क) संदर्भ साधनांचे मूल्यमापन (Evaluation of Sources)

आतापर्यंतच्या चर्चेवरून एक गोष्ट लक्षात येते की, इतिहासलेखनामध्ये संदर्भ साधनांना विशेष महत्त्व आहे. संशोधकाने निवडलेल्या विषयाशी निगडित संदर्भ साधने गोळा केल्यानंतर त्या साधनांचे मूल्यमापन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यास करावे लागते. हाती आलेल्या साधनांच्या आधारेच संशोधकास आपले घटनेसंदर्भातील विचार व्यक्त करावे लागतात. म्हणून प्रो. इ. एच. कार म्हणतात की, सर्व घटना या निर्जीव असतात. त्यांना सजीव करून बोलते करण्याचे काम संशोधकास करावे लागते. इतिहास लेखकाचे अंतिमतः यश त्याने वापरलेल्या साधनांच्या सत्यतेवर अवलंबून असते. म्हणूनच इतिहासकाराने संदर्भ साधनांकडे संशयाने पाहिले पाहिजे. त्यांची सर्वार्थाने सत्यासत्यता पडताळून पाहिली पाहिजे. हे काम अत्यंत काटेकोरपणे करणे गरजेचे असते. ते संशोधकाचे कर्तव्य आहे. म्हणूनच प्रो. इ. एच. कार म्हणतात, "Accuracy is a duty not virtue." कागदपत्रे हाती आल्यानंतर त्यातील मजकुराची सत्यता पडताळण्यासाठी त्यास दोन वेगवेगळ्या अवस्थांमधून मार्गक्रमण करावे लागते. ज्यास विश्लेषणात्मक विवरण (Analytical Operation) असे संबोधले जाते. संशोधकास केवळ घटनांचा शोध लावून चालत नाही तर त्या घटनेमधून योग्य असा निष्कर्ष काढण्याचे कार्य त्यास करावे लागते. कागदपत्रांचे मूल्यमापन करताना हाती आलेला प्रत्येक कागद तावूनसुलाखून घेतला जातो. या संदर्भात प्रो. बी. शेख अली संशोधकाची तुलना डॉक्टरशी करताना म्हणतात, 'संशोधन ही एक प्रक्रिया आहे. कारण यामध्ये कागदपत्रांचे विच्छेदन केले जाते. ज्याप्रमाणे एखादा सर्जन मानवी शरीराची चिरफाड करून त्यामधील असाधारण असा भाग काढून टाकतो, त्याचप्रमाणे इतिहासकार कागदपत्रांवर प्रकाश टाकून त्यांची पात्रता किंवा इतर काही गोष्टी उजेडात आणतो. ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, इतिहास संशोधन पद्धती नकारात्मक स्वरूपाची आहे, होकारात्मक स्वरूपाची नाही. यामुळे संशोधकाला पुराव्यात कोणते दोष आहेत हे समजू शकते व दोष टाळून राहिलेला भाग असेल तेच सत्य असे मानले जाते. सर्जनसुद्धा अशाच प्रकारचे कृत्य करतो. तो रुग्णाला आरोग्य प्रदान करीत नाही तर त्याच्या शरीरात जो असाधारणपणा असतो तो दूर करून त्याच्या शरीराची स्थिती मूळ पदावर आणून ठेवतो. इतिहास संशोधकाचा मुख्य

Scanned by TapScanner

उद्देश हाच असतो की, चुका टाळणे व सत्य जाणून घेणे.'' तेव्हा कागदपत्रे हाती आल्यानंतर त्यातील मजकुराची सत्यता पडताळून पाहिली पाहिजे. संदर्भ साधनांची सत्यता पडताळून पाहण्यासाठी दोन प्रकारच्या कसोट्या, अवस्था वापरल्या जातात. (१) बहिरंग परीक्षण (External Criticism) (२) अंतर्गत परीक्षण (Internal Criticism)

### १. बहिरंग परीक्षण (External criticism)

संदर्भ साधनांच्या मूल्यमापनात बहिरंग परीक्षण ही कसोटी महत्त्वाची मानली जाते. मात्र अनेक इतिहासकारांचे असे मत आहे की, बहिरंग परीक्षण प्रक्रिया ही अंतर्गत परीक्षणापेक्षा दुय्यम आहे. प्रो. हॉकेट यांच्या मते, बहिरंग परीक्षण ही कनिष्ठ प्रकारची टीका आहे. साधनसामग्रीचे संकलन करण्यापासून बहिरंग परीक्षणाची सुरुवात होते, तर कागदपत्रांच्या सत्यतेबद्दल प्रश्न उपस्थित झाले नाहीत तर त्याचे बहिरंग परीक्षण झाले असे समजले जाते. संदर्भ साधनांमध्ये अनेक कारणांमुळे बनावट कागदपत्रे तयार होण्याची आवश्यकता असते. उदा. वारसाहक्क कायमस्वरूपी शाबीत करण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करण्याची शक्यता असते. काही वेळा कागदपत्रे गहाळ झाल्यास त्या जागी बनावट कागदपत्रे तयार केली जातात. काही कागदपत्रे जाणीवपूर्वक बनावट तयार केली जातात, तर काही वेळा एखादी सत्य, अप्रिय घटना लपविण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार केली जातात. काही कागदपत्रांचे लेखक अज्ञात असतात. अशा वेळी त्या कागदपत्रांची सत्यता तपासून पाहता येत नाही. अशा परिस्थितीत साधनांचा खरेखोटेपणा तपासून पाहण्यासाठी बहिरंग परीक्षणामध्ये पुढील प्रक्रियांचा अवलंब केला जातो.

**(अ) लेखकाची सत्यता :** संशोधन करीत असताना ज्या-ज्या वेळी पुरावा, कागदपत्र हाती लागते, त्या वेळी त्याचा मूळ लेखक कोण? याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होतात. कारण पूर्वी सर्वच कागदपत्रांमध्ये लेखकाचे नाव लिहिण्याची पद्धत अस्तित्वात नव्हती. त्यामुळे कागदपत्रांतील माहिती बरोबर असली तरी लेखकाचे नाव माहीत नसल्यामुळे सत्यता पडताळून पाहणे कठीण जाते. बहुतेक वेळा पुढाऱ्यांची भाषणे त्यांचे सहकारी व कर्मचारी लिहून देतात. त्यामुळे एकाचे विचार दुसऱ्याच्या नावावर प्रसिद्ध होतात. काही वेळा छायालेखक (Ghost writer) स्वतःचे नाव उघड न करता स्वतःचे विचार दुसऱ्याच्या नावावर खपवितात. त्यामुळे हाती आलेल्या कागदपत्रांच्या लेखकाची सत्यता पडताळून पाहणे आवश्यक असते.

**(ब) कागदपत्रांचा कालखंड :** कागदपत्रांच्या लेखकाप्रमाणेच त्याचा कालखंड, ते कागदपत्र लिहिले ती जागा, ठिकाण या संदर्भातील सत्यता पडताळणे ओघानेच येते.

Scanned by TapScanner

कारण काही कागदपत्रांवर ती केव्हा लिहिली गेली त्याची तारीख नसते. अशा वेळी लिहिण्यासाठी वापरलेला कागद, शाई, भाषा, लिपीचे वळण यांवरून कागदपत्रांचा कालखंड ठरविला जातो. पण त्यासाठी इतिहासकाराला वेगवेगळ्या काळातील भाषेचे, लिपीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच काही वेळा सद्यःस्थितीत प्रचारात नसलेल्या पण त्या काळात प्रचारात असलेल्या एखाद्या संवत्सराचा उल्लेख असतो. उदा. विक्रम संवत्, शालिवाहन शके इत्यादी. अशा वेळी इतिहासकाराला त्या संवत्सराचा व सध्याच्या कालखंड मापनाचा संबंध प्रस्थापित करता आला पाहिजे. तरच त्या कागदपत्रांमध्ये अचूकता येईल.

**(क) शब्दांचा अचूक अर्थ लावणे :** कागदपत्रांतील शब्दांचा अचूक अर्थ लावणे अत्यंत आवश्यक असते. त्यासाठी कागदपत्रांतील शब्द गतकाळात कोणत्या अर्थाने वापरत होते याची माहिती असणे आवश्यक आहे. एखाद्या विशिष्ट काळात वापरलेले शब्द आता प्रचलित नसतात किंवा त्यांचा अर्थ बदललेला असतो. त्यामुळे ज्या काळातील कागदपत्र आहे त्या काळामध्ये त्या शब्दाचा नेमका काय अर्थ होता हे ठरविणे आवश्यक असते. या संदर्भात **प्रो. गॉसचॉक** म्हणतात, "इतिहासकाराचे मुख्य कार्य कागदपत्र काय म्हणते ते पाहणे तर आहेच, पण त्याचबरोबर त्या लेखकाला काय म्हणावयाचे आहे हे जाणण्याची व अर्थ अचूक ओळखण्याची पात्रता इतिहासकारामध्ये असावी. त्यासाठी भाषाशास्त्रासारख्या साहाय्यभूत शास्त्राची मदत घेणे आवश्यक ठरते."

**(ड) मजकुरातील चुका :** काही वेळा मजकुरामध्ये अभावितपणे किंवा मुद्दाम चुका केलेल्या असतात. तेव्हा त्यांचा शोध घेऊन त्या दुरुस्त करणे आवश्यक असते. एखाद्या प्राचीन ग्रंथाच्या अनेक प्रती सापडल्यास त्यापैकी अव्वल दर्जाची प्रत कोणती हे शोधताना अनेक बाबी लक्षात घ्याव्या लागतात. त्यासाठी भाषेचे मूलभूत ज्ञान, हस्ताक्षराची शैली व शब्दप्रयोग माहीत असणे आवश्यक ठरते. कागदपत्रांतील शब्द बऱ्याच वेळा एकसारखे वाटत असले तरी त्या शब्दांमागची भावना, त्याचा अर्थ लक्षात घेणे आवश्यक आहे. अशा तऱ्हेने बहिरंग परीक्षण करून कागदपत्रांची विश्वसनीयता शोधून काढावी लागते.

## २. अंतर्गत परीक्षण (Internal criticism)

कागदपत्रांच्या मूल्यमापनातील विशेष महत्त्वाची पद्धत म्हणजे अंतर्गत परीक्षण होय. या संदर्भात **प्रो. लँजिलास व सेनबॉस** म्हणतात, "अंतर्गत परीक्षणामध्ये संशोधक साम्यानुमानाच्या आधारे पत्रलेखकाची मनःस्थिती जाणून घेतो व हे कार्य मानसशास्त्राच्या आधारे केले जाते." तर **डॉ. के. एन. चिटणीस** अंतर्गत परीक्षणाबद्दल

Scanned by TapScanner

आपले मत व्यक्त करताना म्हणतात, "बहिरंग परीक्षणाचा हेतू जर काल, स्थल व इतर बाह्य गोष्टी ठरविणे असाच आहे, तर अंतर्गत परीक्षणाचा हेतू कागदपत्रांच्या आत शिरून त्यांचे विश्लेषण करणे व शेवटी कागदपत्रांतील घटना सत्य या नात्याने जगापुढे आणणे हाच असतो. थोडक्यात, बहिरंग परीक्षणामध्ये संदर्भ साधनांची सत्यासत्यता प्रस्थापित केली जाते, तर अंतर्गत परीक्षणामध्ये विश्वासार्हता प्रस्थापित केली जाते."

अंतर्गत परीक्षणातील महत्त्वाची बाब म्हणजे कागदपत्र ज्या भाषेत असेल ती भाषा इतिहासकाराला ज्ञात असावी. कारण कागदपत्रांत व्यक्त केलेल्या मजकुरापाठीमागे लेखकाचा कोणता हेतू आहे हे स्पष्ट होते. अनेक वेळा लिखित भाषा आणि बोलीभाषा भिन्न-भिन्न असते. काळाच्या ओघात भाषा उत्क्रांत होत असते, तर काही भाषा ठरावीक गटापुरत्या, प्रदेशापुरत्या मर्यादित असतात. या सर्वांचा साकल्याने विचार करून त्या भाषेतील शब्दाचा, शब्दसमूहाचा योग्य तो अर्थ लावणे अपेक्षित असते. अन्यथा शब्दाच्या अर्थाचा अनर्थ होतो.

बहिरंग परीक्षणाने कागदपत्रांची सत्यता पटल्यानंतर त्यातील मजकुराची किंवा माहितीची सत्यता पडताळून पाहणे तितकेच आवश्यक असते. अंतर्गत परीक्षण करताना इतिहासकाराला काही गोष्टी तपासून पाहाव्या लागतील.

१. पत्रातील मजकूर ज्या काळातील आहे त्या काळातील भाषेचे ज्ञान इतिहासकाराला असणे आवश्यक आहे. अन्यथा त्यातील मजकुराचा योग्य अर्थ लावता येणार नाही.

२. लेखकाची विश्वसनीयता तपासून पाहणेही आवश्यक आहे. लेखक दुसऱ्याच कुणाच्या नावावर तो कागद लिहीत नाही ना, हे पडताळून पाहिले पाहिजे. नाहीतर मजकूर खोटा असण्याची शक्यता असते.

३. लेखक समकालीन आहे की नाही, प्रत्यक्ष घटना घडली तेव्हा तो हजर होता की नाही हे तपासणे आवश्यक आहे. नंतरच्या काळातील किंवा घटना घडत असताना हजर नसलेला लेखक ऐकीव माहितीवरून लेखन करीत आहे काय, का मूळ कागदपत्रे पाहून लेखन करीत आहे हे तपासून पाहावयास हवे. त्यावर त्या कागदपत्रांची विश्वसनीयता अवलंबून असते म्हणूनच कल्हणाच्या राजतरंगिणीला इतिहास म्हटले जाते. कारण कल्हणाने मूळ साधने पाहून लेखन केले आहे.

४. लेखकाने ज्या कागदपत्रांच्या आधारे माहिती दिली आहे, त्यासंबंधी संपूर्ण कागदपत्रे त्यास उपलब्ध होती का व ती त्याने वस्तुनिष्ठतेने वापरली आहेत का हे पडताळून पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

Scanned by TapScanner

५. लेखक स्वत:च्या इच्छेने लिहितो आहे की, कोणाच्या आज्ञेने हे पाहणेही आवश्यक आहे. दरबारी लेखकांच्या बाबतीत ही काळजी घेणे अत्यंत जरुरीचे आहे. स्वत:च्या राजाच्या आज्ञेने लिहिताना तो राजाची अवास्तव स्तुती करणार हे उघडच आहे. त्यामुळे अशी कागदपत्रे अत्यंत काळजीपूर्वक वापरली पाहिजेत. त्यामध्ये अतिरंजितता असणे स्वाभाविक आहे.

६. काही वेळा लेखक एखाद्या व्यक्तीविषयी आत्यंतिक आदर वाटत असल्यामुळे लेखन करतो. अशा लेखनामध्ये वस्तुनिष्ठतेपेक्षा व्यक्तिनिष्ठता डोकावण्याची शक्यता असते. तसेच एखाद्या व्यक्तीविषयी वाटणाऱ्या मत्सराने किंवा पूर्वग्रहामुळे त्या व्यक्तीचे नसलेले दोषही चिकटविण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा कागदपत्रांकडे डोळसपणे पाहणे जरुरीचे आहे. विशेषत: चरित्र लेखनासंबंधी अशी काळजी घेणे अत्यंत जरुरीचे आहे.

७. आत्मचरित्रांच्या बाबतीतही काळजी घेणे आवश्यक असते. स्वत:चे दोष किंवा चुका लपवून ठेवून फक्त गुणांचे किंवा केलेल्या कार्याचे अतिरंजित वर्णन करण्याकडे लेखकाचा कल नाही ना हे पाहणे आवश्यक आहे.

८. कथा, नाटके, काव्ये, वाक्प्रचार अशा ललितलेखनामध्ये अनेक ऐतिहासिक घटनांचे कथन केलेले असते. मात्र त्यांची सत्यता तपासून पाहणे अत्यंत आवश्यक असते. कारण काही वेळा त्यामध्ये काल्पनिक प्रसंग असण्याची शक्यताही असते. पण तरीही काही वेळा इतिहासातील चुकलेले दुवे त्यातून मिळण्याची शक्यताही असते. उदाहरणार्थ, गुप्त घराण्यातील समुद्रगुप्तानंतर रामगुप्त हा त्याचा ज्येष्ठ पुत्र गादीवर आला होता, अशी कथा देवी चंद्रगुप्तम या नाटकात आली आहे. बराच काळ ही काल्पनिक कथा असावी, असेच मानले जात होते. मात्र आता रामगुप्ताची नाणी सापडली आहेत. त्यावरून या कथेची सत्यता पटते. म्हणून ललितलेखनाचा काळजीपूर्वक वापर केल्यास ती उपयोगी पडतात.

९. कागदपत्रांमध्ये दिलेली माहिती इतर साधनांद्वारे पडताळून पाहता आली पाहिजे; अन्यथा ती विश्वसनीय मानू नये. वरील रामगुप्ताच्या कथेचे उदाहरण यासंदर्भात बोलके आहे.

१०. एखादी गुप्त गोष्ट म्हणजे सैन्यरचना, सैन्याच्या हालचाली इत्यादींविषयी लेखक माहिती देत असल्यास लेखकाला ती माहिती उपलब्ध होणे शक्य होते का? त्याचा दर्जा कोणता होता? हेही पडताळून पाहणे आवश्यक आहे.

Scanned by TapScanner

अशा तऱ्हेने उपलब्ध साधनांची अंतर्गत आणि बहिरंग तपासणी करूनच त्यांचा इतिहासलेखनासाठी वापर करावा. त्याबरोबरच या साधनांचा वापर इतिहासकाराने वस्तुनिष्ठतेने करणेही अत्यंत आवश्यक आहे. त्यामध्ये व्यक्तिनिष्ठता येता कामा नये.

**पुराव्यांचा अभ्यास :** इतर सामाजिक शास्त्रांप्रमाणे इतिहासलेखन निरीक्षणावर आधारित नसते. कारण ऐतिहासिक घटना फार पूर्वी घडून गेलेल्या असतात. त्यामुळे मागे राहिलेल्या पुराव्यांच्या आधारे इतिहासकाराला लेखन करावे लागते. इतिहासाचे ज्ञान हे निरीक्षणात्मक ज्ञान नव्हे ते अप्रत्यक्ष स्वरूपाचे आहे. त्यामुळे प्रत्यक्ष घटना न पाहताही उपलब्ध पुराव्यांचा तर्कसुसंगत अर्थ लावणे हे इतिहासकाराच्या क्षमतेवर अवलंबून असते. उपलब्ध पुराव्यांमधून सर्व घटनांची कालक्रमानुसार संगती लावणे व त्यामधून योग्य निष्कर्ष काढणे यासाठी इतिहासकार चांगल्या क्षमतेचा असणे जरुरीचे आहे. त्याला तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक परिस्थितींची जाणीव असली पाहिजे. समकालीन इतर घटनांचे ज्ञान असले पाहिजे. कारण समकालीन इतर घटना संबंध नसलेल्या घटनांवरही अप्रत्यक्षपणे परिणाम करीत असतात. उदाहरणार्थ, अमेरिकेत आलेल्या आर्थिक परिस्थितीचे परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवरही होत असतात किंवा शेजारी राष्ट्रांमध्ये निर्माण झालेल्या राजकीय अस्वस्थतेचे परिणाम आपल्या राष्ट्रावरही होत असतात. त्यामुळे इतिहासकाराला समकालीन घटनांचे भान असणे आवश्यक असते.

त्याचप्रमाणे इतिहासाचा अन्वयार्थ लावताना वेगवेगळे जे सैद्धांतिक विचार मांडले जातात त्याचेही इतिहासकाराला भान हवे. एकाच घटनेचा अन्वयार्थ राष्ट्रवादी विचारसरणीचे विद्वान जो अर्थ लावतील तसाच अर्थ मार्क्सवादी विचारसरणीचे विद्वान लावतील असे नाही. म्हणून वेगवेगळ्या विचारसरणींच्या विद्वानांची मते जाणून घेऊन स्वतंत्ररित्या त्या-त्या घटनांचा अन्वयार्थ लावण्याची क्षमता इतिहासकारामध्ये असावयास हवी. अशा वेळी इतिहासकाराची कसोटी असते. इतिहासकाराने अशा वेळी भावनेच्या आहारी न जाता वस्तुनिष्ठतेने साधनांचे परीक्षण केले पाहिजे.

## ५) पूर्वग्रह आणि वस्तुनिष्ठता

गतकालीन घटनांचा आलेख रेखाटण्यासाठी इतिहासकार भूतकाळाचा मागोवा घेत असतो. गतकालीन समग्र वाटचाल सत्य, वास्तव स्वरूपात त्यास समाजासमोर मांडायची असते, तेव्हा पुरावा जमा करून घटनांविषयी माहिती संकलित करणे एवढेच इतिहासाचे उद्दिष्ट नसते, तर प्राप्त झालेल्या माहितीचे यथार्थपणे विश्लेषण होणे जरुरीचे असते. पुरावा स्वतः काहीच सांगत नाही, तर पुराव्यांना बोलते करणे हे इतिहासकाराचे काम

Scanned by TapScanner

आहे. पुराव्याच्या साहाय्याने घटना सांगताना इतिहासकारच आपली मते व्यक्त करत असतो. त्यामुळे यामध्ये शंभर टक्के वस्तुनिष्ठता असेलच असे सांगता येत नाही. कारण व्यक्ती तितक्या प्रवृत्ती याप्रमाणे संशोधक गतकालीन घटनेकडे कोणत्या दृष्टीकोनातून पाहतो यावर त्या घटनेचे विश्लेषण अवलंबून असते. सर्वसाधारणपणे एखाद्या घटनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा व्यक्तिनिष्ठ असतो. विशेषतः ज्या ठिकाणी निवडीचा प्रश्न येतो, तिथे व्यक्तिनिष्ठता येण्याची शक्यता अधिक असते. म्हणूनच प्रो. इ. एच. कार आपल्या 'What is History ?' या ग्रंथात म्हणतात, "घटना बोलत नाहीत, तर इतिहासकारच घटनांद्वारे बोलत असतो." म्हणून इतिहास संशोधकाने विश्लेषणात्मक दृष्टी ठेवली पाहिजे. व्यक्तिनिष्ठ दृष्टीकोनातून इतिहासलेखन केल्यास त्यामध्ये पूर्वग्रह, आकस, एकांगी विचार या बाबींचा समावेश होतो. आपलेच योग्य, दुसऱ्याचे अयोग्य असा दृष्टीकोन स्वीकारला जातो. ज्या व्यक्तीबद्दल, घटनेबद्दल आपल्याला कळवळा आहे, सहानुभूती आहे, प्रेम आहे अशा व्यक्ती, घटना याबद्दल लिखाण करत असताना व्यक्तिनिष्ठ दृष्टीकोन स्वीकारला जातो. कारण इतिहासकार हा देखील एखाद्या समाजाचा, धर्माचा, वंशाचा, पंथाचा घटक असतो आणि कळत-नकळत उपरोक्त बाबींपैकी कशाचा ना कशाचा त्यावर प्रभाव असतो. त्याप्रमाणे तो लेखन करत असतो. सर्वसाधारणपणे समाजाची इतिहासकाराकडून अशी अपेक्षा असते की, त्याने इतिहासलेखन करताना जास्तीतजास्त वस्तुनिष्ठ दृष्टीकोनाचा अंगीकार करावा. एखाद्या व्यक्तीबद्दल, जातीबद्दल, धर्माबद्दल, वंशाबद्दल, समूहाबद्दल, राष्ट्राबद्दल जर आपण पूर्वग्रह बाळगून इतिहासलेखन करत असू तर ते लेखन इतिहासाचा विपर्यास करणारे ठरेल. मथितार्थ हाच की, वस्तुनिष्ठ दृष्टीकोनाऐवजी व्यक्तिनिष्ठ दृष्टीकोनातून आपण गतकालीन घटनांचा मागोवा घेऊ लागलो तर इतिहासाचे विकृत रूप समाजासमोर मांडले जाईल आणि ते समाजास हानिकारक ठरेल.

वस्तुनिष्ठता आणि व्यक्तिनिष्ठता या दोन संकल्पनांमुळे आधुनिक काळात इतिहास शास्त्र की कला असा वाद निर्माण झाला. नैसर्गिक शास्त्रांचा अभ्यासक्रम ज्याप्रमाणे प्रयोगशाळेत एखाद्या नमुन्याचे विश्लेषण करीत असतो, त्याप्रमाणे इतिहास संशोधकाने तत्कालीन घटनांचे विश्लेषण केले पाहिजे अशी कल्पना मान्य केल्यामुळे इतिहासाला शास्त्राचा दर्जा देण्यात आला. परंतु नैसर्गिक शास्त्राप्रमाणे शंभर टक्के वस्तुनिष्ठता इतिहासामध्ये शक्य आहे का याचाही विचार केला पाहिजे. इतिहासलेखनाची प्रक्रिया मूलतः मानसिक असते. त्यातच एखाद्या विचारसरणीची निवड, विषयाची निवड आणि साधनांची, पुराव्यांची निवड या बाबी महत्त्वाच्या असतात. जिथे निवडीचा संबंध येतो,

Scanned by TapScanner

व्यक्तिनिष्ठता येण्याची शक्यता अधिक असते. कारण एखाद्या विचारसरणीची केल्यानंतर इतिहासकार त्याच दृष्टीकोनातून घटनांचा विचार करतो. तसेच ज्या निवडल्या असतील त्यांचाही तो समतोल विचार करेलच असे नाही. इतिहासाला मानले तरी इतिहासकाराच्या मनामध्ये, विचारांमध्ये जी व्यक्तिनिष्ठता डोकावते अनेक घटक कारणीभूत असतात.

१. **वैयक्तिक पूर्वग्रह :** इतिहासलेखन ही प्रक्रिया व्यक्तीच्या मानसिक स्थितीवर बून असल्यामुळे त्या व्यक्तीच्या आवडीनिवडी व निर्णय यावर त्या घटनांचा र्थ अवलंबून असतो. इतिहासकाराला एखादी ऐतिहासिक व्यक्ती आवडत असेल, त्या व्यक्तीचे जे गुण आहेत, त्यापेक्षा मोठे करून सांगेल तर त्याच्या अंगी त्या दोषांवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करेल. या उलट, एखाद्या व्यक्तीविषयी कराचे मन पूर्वग्रहदूषित असेल, तर त्याचे दोष अधिक मोठे करून सांगेल आणि गुणांकडे दुर्लक्ष करेल. उदा. मोगल दरबारामध्ये नियुक्त केलेले इतिहासकार की अलेक्झांडर स्वारीवेळी त्याच्याबरोबर आलेले इतिहासकार असोत यांनी निष्ठ दृष्टीकोनातून इतिहासलेखन केल्यामुळे मोगल–मराठा संघर्षाचे सत्य स्वरूप होत नाही. तसेच खाफीखानाच्या मनात मराठ्यांबद्दल पूर्वग्रह असल्याने तो महाराजांच्या पराक्रमाकडे दुर्लक्ष करतो, तर आलमगीर बादशहाचा पराक्रम ने मांडतो. हे सर्व घडते व्यक्तिनिष्ठ, आत्मनिष्ठ दृष्टीकोनामुळे. तात्पर्य, वैयक्तिक इतिहासाला मारक ठरतो.

. **एखाद्या जमावाविषयी पूर्वग्रह :** एखाद्या विशिष्ट समूहाविषयी इतिहासकाराच्या र्वग्रह असेल तर वस्तुनिष्ठतेला बाधा निर्माण होते. त्यामुळे अशा गटांविषयी करताना पूर्वग्रह दूर करण्याऐवजी एखाद्या साध्या घटनेनेही पूर्वग्रहांना अधिकच मिळते. अशा स्थितीत इतिहासकार एक स्वतंत्र घटक या नात्याने त्याचा करत नाही तर एका गटाचा प्रतिनिधी म्हणून आपली मते मांडत असतो. जांचा मराठा, हिंदू व मुस्लिमांबद्दल, मुस्लिमांचा हिंदूबद्दल, हिंदूंचा मुस्लिमांबद्दल चा दृष्टीकोन हा पूर्वग्रहावर आधारित असल्याचे दिसून येते. याचबरोबर धर्म, थ, वंश, राष्ट्र इत्यादी घटकांवर आधारित समूहदेखील इतिहासलेखनावर प्रतिगामी वा परिणाम करतात.

. **ऐतिहासिक अन्वयार्थाचे सिद्धांत :** केवळ घटनांची सुसंगतवार मांडणी करणे इतिहास नव्हे, तर त्या ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ लावणे हेदेखील इतिहासकाराचे चे कार्य आहे. घटना घडण्यापाठीमागच्या कारणांचा अभ्यास करताना इतिहासकाराने

Scanned by TapScanner

कोणता दृष्टीकोन स्वीकारला, कोणता निकष वापरला हेही महत्त्वाचे असते. ऐतिहासिक घटना या तथ्य असल्या तरी त्या घटनांचा अन्वयार्थ हा इतिहासकाराच्या दृष्टिकोणावर अवलंबून असतो. उदा. एखाद्या घटनेचा अर्थ हेगेलच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे किंवा मार्क्सच्या तत्त्वज्ञानाप्रमाणेही लावता येतो. १७ व्या शतकात शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. हेगेलच्या मते, स्वराज्य स्थापण्याची कल्पना जास्त महत्त्वाची आहे. कारण कल्पना निर्माण झाली तरच स्वराज्य स्थापन करता येते, तर मार्क्सवादानुसार नुसतीच कल्पना महत्त्वाची नाही तर इतर परिस्थितीही तितकीच महत्त्वाची आहे. मार्क्सच्या मते, स्वराज्य स्थापनेला कल्पनेपेक्षा सभोवतालची परिस्थिती जास्त महत्त्वाची आहे. म्हणजेच वेगवेगळ्या सिद्धांतांनुसार वेगवेगळे अन्वयार्थ, निष्कर्ष निघतात. त्यातून वैचारिक क्लेश निर्माण होतो आणि वस्तुनिष्ठता धोक्यात येते.

अशा तऱ्हेने अनेक सिद्धांत असले तरी इतिहासकाराने कोणत्याही एका सिद्धांताचा स्वीकार न करता अनेक सिद्धांतांचा समन्वय साधला पाहिजे. तसेच इतिहासकाराला आपल्या अन्वयार्थाला सर्वसमावेशक करावयाचे असेल तर पूर्वग्रह बाजूला ठेवूनच सर्व घटनांचा विचार करावयास हवा. इतिहासकाराने तटस्थ राहून सर्व पुराव्यांचा साकल्याने विचार करून कोणताही पूर्वग्रह येऊ न देता, व्यक्तिनिष्ठता येऊ न देता वस्तुनिष्ठतेनेच घटनांपाठीमागचे सत्य मांडले पाहिजे.

थोडक्यात वस्तुनिष्ठता ही कठीण समस्या असली तरी ते आधुनिक शास्त्राचे वैशिष्ट्य आहे. इतिहासातील वस्तुनिष्ठता म्हणजे सर्व प्रकारच्या समज–अपसमजापासून अलिप्त राहून, कोणाविषयीही सहानुभूती न बाळगता, कोणाविषयीही पूर्वग्रह, आकस, द्वेष न बाळगता प्रामाणिकपणे घटनेचे विश्लेषण करून घटनेतील सत्य समाजासमोर मांडणे म्हणजेच वस्तुनिष्ठता होय. अखेर प्रो. वॉल्श म्हणतात त्याप्रमाणे "खरा इतिहास हा वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातूनच रेखाटला जाऊ शकतो." तेच सत्य आहे.

### (ड) सादरीकरण (Presentation)

आतापर्यंत आपण इतिहासाचे तीन टप्पे अभ्यासले. ते म्हणजे संशोधन विषयाची निवड करणे, प्रकरणांची व संदर्भ साधनांची मांडणी करणे, आपण संकलित केलेल्या संदर्भ साधनांचे मूल्यमापन करणे. हे सर्व संपल्यानंतर इतिहासकारास संकलित केलेल्या संदर्भ साधनांचा अन्वयार्थ लावावा लागतो. हा अन्वयार्थ शास्त्रीय पद्धतीचा किंवा पद्धतीशास्त्रातील शिस्त व नियमांचा वापर करून लावावा लागतो. हे करत असताना इतिहास संशोधकाच्या बौद्धिक पातळीचा, त्याच्या ज्ञानाचा, अनुभवाचा, त्याच्या भाषेवरील



Scanned by TapScanner

प्रभुत्वाचा, त्याच्या संशोधन क्षेत्रात उपयुक्त ठरणाऱ्या सर्व कौशल्यांचा कस लागतो. हे अन्वयार्थ लावण्याचे कौशल्य प्राप्त केल्यानंतर संदर्भ साधनांतील अनेक घटनांचा कार्यकारणभाव म्हणजेच त्या घटनांचा परस्परसंबंध स्पष्ट होतो. सर्व पुराव्यांचा साकल्याने विचार केला आणि त्यांचा अन्वयार्थ लावला की मग त्या विषयाची मांडणी कशी करावयाची असा प्रश्न येतो. सुरुवातीस इतिहास संशोधकाच्या मनात जे गृहितक असेल त्याचे रूपांतर सिद्धांतामध्ये होते. इतिहासकाराने लेखन करताना ते प्रभावीपणे मांडले पाहिजे. इतिहासकाराला जो अर्थ अभिप्रेत आहे तोच अर्थ वाचकांपर्यंत पोहोचला पाहिजे. अशा तऱ्हेने साधनांची जुळवाजुळव करून त्यांचा अन्वयार्थ लावून ते सुसंगतपणे मांडणे हे इतिहासकाराचे कर्तव्य आहे. ललित लेखन आणि इतिहास यामध्ये मूलभूत फरक आहे. ललित लेखनामध्ये लेखक जरी एखाद्या ऐतिहासिक घटनेविषयी किंवा व्यक्तिमत्त्वाविषयी लेखन करीत असला तरी त्यामध्ये रंजकता आणण्यासाठी काल्पनिक प्रसंग घालू शकतो. त्यासाठी त्याला पुरावे देण्याची गरज नाही. पण इतिहासकाराला तसे करता येत नाही. त्याला प्रत्येक घटना किंवा प्रसंग लिहिताना तो पुराव्याने सिद्ध करून लिहावा लागेल तरच तो इतिहास होईल. अन्यथा ते कथा, कादंबरी, नाटक, काव्य असे ललित लेखन ठरेल. ललित लेखन इतिहासाचे साधन होऊ शकेल पण इतिहास नाही. अशा रीतीने ऐतिहासिक घटनांचे अर्थप्रवाही स्पष्टीकरण करणे, त्याचा अन्वयार्थ लावणे म्हणजेच इतिहासाचे सादरीकरण होय. या सादरीकरणात तर्कसंगत व वस्तुनिष्ठ स्पष्टीकरणास महत्त्वाचे स्थान आहे. असे असेल तरच इतिहासाची विश्वासार्हता सिद्ध होते. सादरीकरणात घटनांचे वर्गीकरण करून त्यांचा अन्वयार्थ लावावा लागतो. कार्यकारणभाव स्पष्ट करावा लागतो. सामान्यीकरण करावे लागते. त्यातून काही निष्कर्ष व अनुमाने काढावी लागतात. हे सर्व करत असताना घटनेची कालनिश्चिती करून कालानुसार सादरीकरण करावे लागते. घटनांचा अन्वयार्थ लावून त्याचे सादरीकरण करत असताना इतिहासकारास पुढील गोष्टींचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

**सामान्यीकरण :** इतिहास म्हणजे केवळ भूतकाळात रमणे नव्हे किंवा इतिहास म्हणजे केवळ कला, कल्पनारंजन नाही तर ते एक शास्त्र आहे हे मर्म एकदा समजावून घेतले की नैसर्गिक शास्त्राप्रमाणे इतिहासात सामान्यीकरण असते का? ते कितपत असते? असे प्रश्न उपस्थित होतात. त्या दृष्टीकोनातून अनेक इतिहासकारांनी जे विवेचन केले त्यातून सामान्यीकरण म्हणजे काय ते स्पष्ट झाले. नैसर्गिक शास्त्रात जसे निश्चित सामान्यीकरण स्वीकारले जाते तसे इतिहासात घडत नाही. कारण इतिहासात काहीसे अंदाजाने, मागील घटनांमधून आलेल्या अनुभवावरून सामान्यीकरण व्यक्त केले जाते.

Scanned by TapScanner

कारण गतकालीन घटना या विशिष्ट काळाच्या संदर्भात घडलेल्या असल्या सामान्यीकरणास मर्यादा येतात. म्हणजेच निश्चित, साचेबंद सामान्यीकरण इतिहासा शक्य होत नाही. अर्थात, सामान्यीकरण हा इतिहासाचा गाभा आहे. तेव्हा सामान्यीकरण करताना घटनांचा कार्यकारणभाव स्पष्ट झाला पाहिजे. घटना या एकाच विषयाची अने अंगे किंवा भाग आहेत हे स्पष्ट झाले पाहिजे. घटनांच्या सामान्यीकरणासाठी विवि मतप्रवाहांचा सखोल अभ्यास करूनच तर्कसंगत व वस्तुनिष्ठ असे मत मांडावे. म मांडताना फारसा उतावळेपणा व घाईगडबड करू नये. तात्पर्य, गतकाळात घडलेल्य घटनेसंदर्भात हाती आलेल्या पुराव्यांवरून काही अंदाज, तर्क केले जातात. म्हणजे एखाद्या विशिष्ट काळी, विशिष्ट स्थळी, विशिष्ट परिस्थितीत असे घडले होते. त्यामुळे आताही तत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास तसेच घडेल असे मान्य करणे म्हणजे सामान्यीकरण होय.

**साम्यानुमान :** साम्यानुमान म्हणजे ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ लावत असतान दोन घटनांमधील साम्य, समानता लक्षात घेणे होय. या समानतेवर किंवा साधर्म्यावरू निष्कर्ष काढणे शक्य होते व ते इतिहासलेखन प्रक्रियेत सर्वमान्य आहे. कारण दोन समा घटना, दोन समान प्रसंगी दोन समान व्यक्ती यामध्ये साधर्म्य असल्यास त्यांच्या अन्वयार्था इतिहास समजून घेण्यास मदत होते. उदा. दोन राजांच्या गुणांची तुलना किंवा दो राजांच्या अन्यायी व जुलमी धोरणांची तुलना इत्यादी.

**सिद्धांत कल्पना :** गतकालीन घटनेसंदर्भात उपलब्ध होणाऱ्या कागदपत्रांवरून पुराव्यानुसार सिद्धांत कल्पना बदलत जाते. कागदपत्रांच्या अभावामुळे संशोधक तर्कसं अनुमानाच्या आधारे सिद्धांत कल्पना मांडत असतो. परिणामी त्यात काही त्रुटी राहण्या संभव असतो. मात्र कालांतराने ती त्रुटी भरून काढणारा संदर्भ उपलब्ध झाल्यानं मूळची सिद्धांत कल्पना अस्तित्वात राहत नाही. अशा वेळी इतिहास संशोधकाने आपल सिद्धांतात व विचारात आवश्यक तो बदल करून त्या घटनेचे सादरीकरण करा अन्यथा इतिहासाची विश्वासार्हता कमी होईल. त्या वस्तुनिष्ठ ऐतिहासिक घटने प्रतारणा ठरेल.

इतिहासलेखन प्रक्रियेत सादरीकरण करत असताना कोणत्या घटकास महत्त्व द्यावे हे संशोधकाने घटनेच्या महत्त्वावरून ठरवावे लागते. घटनांविषयी लिहीत असताना त्या-त्या घटनेस योग्य ती जागा द्यावी. घटनेचे सादरीकरण करत असताना इतिहासकाराची भाषा ही साधी, सोपी व सरळ अर्थ स्पष्ट करणारी असावी. ती भाषा सर्वसामान्य वाचकास समजेल, त्यातून अर्थबोध होईल अशी असावी. सामान्य वाचक इतिहासास

Scanned by TapScanner

हक्ष विषय समजतो. म्हणून इतिहासलेखनाची भाषा साधी, सोपी, सुटसुटीत व सुबोध असावी. लिखाणात आकर्षक व नेमका अर्थ स्पष्ट करणाऱ्या शब्दांचा वापर करावा. असे असेल तर आपल्या इतिहासलेखनाच्या सादरीकरणास व भाषेस एक विशिष्ट दर्जा प्राप्त होईल. लेखन हे प्रवाही व अर्थपूर्ण असावे. जेणेकरून आपले इतिहासलेखन हे सामान्य वाचकास गोडी निर्माण करणारे वाटले पाहिजे. अशा प्रकारे इतिहासलेखनाचे सादरीकरण असावे.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**प्रश्न १ : वस्तुनिष्ठ प्रश्न**

**प्रश्न : खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य तो पर्याय निवडा.**

१. संशोधन प्रक्रियेमध्ये .......... ही प्रथम पायरी आहे.

*(अ) पुराव्यांचे संकलन* *(ब) विषयाची निवड*

*(क) साधनांची सुसंगती लावणे* *(ड) भूतकाळाची मांडणी*

२. "कागदपत्रे नाहीत, इतिहास नाही" असे ........ या इतिहासकाराने म्हटले आहे.

*(अ) प्रा. लँजिलॉस व सेनबॉस* *(ब) प्रो. इ. एच. कार*

*(क) प्रो. डी. डी. कोसंबी* *(ड) प्रो. जी. आर. एलटन*

३. इतिहासकारात वैयक्तिक पूर्वग्रह असल्यास इतिहासलेखनामध्ये ........ डोकावते.

*(अ) वस्तुनिष्ठता* *(ब) व्यक्तिनिष्ठता*

*(क) सैद्धांतिक द्वंद्व* *(ड) तर्कसंगती*

४. .......... मध्ये लेखकाची सत्यता तपासून पाहिली जाते.

*(अ) कालनिर्णय* *(ब) सूची*

*(क) बहिरंग परीक्षण* *(ड) अंतर्गत परीक्षण*

५. प्रो. इ. एच. कार यांनी ........ हा ग्रंथ लिहिला.

*(अ) इतिहासाचे स्वरूप* *(ब) इतिहास म्हणजे काय?*

*(क) इतिहास अभ्यासाची प्रस्तावना* *(ड) इतिहास संशोधन पद्धती*

Scanned by TapScanner

**प्रश्न २ : लघूत्तरी प्रश्न / टीपा लिहा / थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. विषयाची निवड

२. प्रकरणांची मांडणी

३. सादरीकरण

४. वस्तुनिष्ठता व व्यक्तिनिष्ठता

५. बहिरंग परीक्षण

६. अंतर्गत परीक्षण.

**प्रश्न ३ : दीर्घोत्तरी प्रश्न**

१. इतिहासलेखन प्रक्रियेतील वेगवेगळ्या टप्प्यांची माहिती द्या.

२. बहिरंग परीक्षण म्हणजे काय? त्यासाठी कोणती परिमाणे वापरली जातात?

३. अंतर्गत परीक्षण करताना कोणत्या गोष्टी तपासून पाहणे आवश्यक असते?

४. वस्तुनिष्ठता आणि व्यक्तिनिष्ठता यातील फरक सांगून इतिहासलेखनातील वस्तुनिष्ठतेचे महत्त्व स्पष्ट करा.

Scanned by TapScanner